# विवेकानंद कॉलेजच्या बीबीए आणि एमबीए विद्यार्थ्यांचे कॅम्पस प्लेसमेंटमध्ये घवघवीत यश

## संकेत खद्रे याला तब्बल १८ लाखांचे सर्वोच्च पॅकेज; गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न

**कोल्हापूर:** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित विवेकानंद कॉलेजने आपल्या शैक्षणिक आणि प्रशिक्षण दर्जामधील उत्कृष्टतेची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे. कॉलेजच्या बीबीए (BBA) आणि एमबीए (MBA) मधील विद्यार्थ्यांची विविध नामांकित नॅशनल आणि मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये उत्तम पॅकेजसह निवड झाली असून, सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.



संकेत खद्रे

बिझनेस ॲनालिटिक्स स्पेशलायझेशनचे शिक्षण घेत असलेल्या संकेत खद्रे याने सर्वाधिक १८ लाख रुपये वार्षिक पॅकेज मिळवले आहे. ह्युमन रिसोर्स स्पेशलायझेशनमधील श्रेया भोसलेला १० लाखांचे, तर प्रणाली भामनगोल हिला ५.६ लाखांचे पॅकेज मिळाले आहे. फायनान्स स्पेशलायझेशनच्या कुणाल भोसले याला ४ लाख आणि मार्केटिंगमधील शालिनी जांगीड हिला देखील ४ लाखांचे पॅकेज मिळाले आहे. याशिवाय इतर अनेक विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रातील नॅशनल आणि मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये निवड झाली आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी कॉलेजमध्ये एका विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) मा. श्री. कौस्तुभ गावडे, कॉलेजचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे प्रमुख डॉ. सी. बी. पाटील, संस्थेच्या इचलकरंजी येथील कन्या महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रुती जोशी आणि बीबीए-एमबीए विभागाचे प्रमुख डॉ. विराज जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते निवड झालेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना सीईओ मा. श्री. कौस्तुभ गावडे यांनी "विवेकानंद कॉलेजमधील बीबीए आणि एमबीए अभ्यासक्रमांमध्ये कौशल्य विकासावर विशेष भर दिला जातो. विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट क्षेत्रासाठी सज्ज करणे आणि त्यांच्यामधून भविष्यातील उत्तम नेतृत्व घडवणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्यावर खूप मेहनत घेतात आणि आजचे प्लेसमेंटचे यश हे शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या एकत्रित कष्टाचे फळ आहे", असे प्रतिपादन केले.

कॉलेजचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी आपल्या मनोगतात, विद्यार्थ्यांनी आपली व्यावसायिक जबाबदारी नेहमी प्रामाणिकपणे आणि निष्ठेने पार पाडावी. कठोर परिश्रमाला नेहमीच फळ मिळते. नोकरीच्या ठिकाणी इमानदार राहा आणि आपल्या संस्थेचे नाव मोठे करा, असे प्रतिपादन केले.

इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे प्रमुख डॉ. सी. बी. पाटील यांनी आपल्या मनोगतात, आजच्या या वेगाने बदलणाऱ्या आणि स्पर्धेच्या युगात टिकून राहायचे असेल तर नवीन कौशल्ये आत्मसात करणे अत्यंत गरजेचे आहे. स्वतःमधील कौशल्ये वाढवण्याची आणि शिकण्याची प्रक्रिया कधीही थांबवू नका, असे मत मांडले.

या संपूर्ण वाटचालीत विद्यार्थ्यांना संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या दूरदृष्टीचा आणि पाठिंब्याचा विद्यार्थ्यांच्या करिअरला आकार देण्यात मोठा वाटा आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार बीबीए-एमबीए विभागाचे प्रमुख डॉ. विराज जाधव यांनी केले. ही प्लेसमेंट ड्राइव्ह यशस्वी करण्यासाठी मेहनत घेणारे सर्व मान्यवर, प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.



ADVT

पुण्य नगरी
बुधवार, २९ जुलै २०२६

# 'विवेकानंद'मध्ये सायबर सिक्युरिटीवर इंडस्ट्री इंटर ॲक्शन

**कोल्हापूर :** येथील विवेकानंद कॉलेजच्या बीसीएस विभागातर्फे सायबर सिक्युरिटी विषयावरील इंडस्ट्री इंटर ॲक्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी व्हाईट ॲरो सायबर सिक्युरिटी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी ऋषीकेश वाळवेकर यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व आणि या क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. वाळवेकर यांनी संगणक सुरक्षा, डेटा संरक्षण, आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी, बोगस लिंक व संशयास्पद संदेशांपासून सुरक्षित राहण्याचे उपाय यांची सविस्तर माहिती दिली, तसेच सायबर सिक्युरिटी क्षेत्रातील विविध सर्टिफिकेशन, रोजगाराच्या संधी आणि ऑनलाईन फसवणूक झाल्यास तक्रार कोठे व कशी करावी, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक व स्वागत बीसीएस विभागप्रमुख प्रा. पल्लवी देसाई यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन व आभार प्रा. राजेश माने यांनी मानले. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

दैनिक

दैनिक
जनप्रवास बातम्यांचा राजा
• बुधवार, दि. २९ जुलै २०२६



# कंपनी सेक्रेटरी क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी

## • कपिला टिक्के यांचे मत: विवेकानंद कॉलेजमध्ये व्याख्यान

**जनप्रवास : कोल्हापूर**

विद्यार्थ्यांनी आपली योग्यता आणि आवड जाणून भविष्यातील करिअर निवडावे. आजच्या युगात वाणिज्य शाखेला अनन्यसाधारण महत्त्व आले असून कंपनी सेक्रेटरी करिअरमध्ये नानाविध संधी प्राप्त झाल्या आहेत. विद्यार्थ्यांना उज्ज्वल करिअरसाठी सीएस हा उत्तम पर्याय आहे. विद्यार्थ्यांनी आपले भविष्य घडवावे, असे मत कंपनी सेक्रेटरी कपिला टिक्के यांनी व्यक्त केले. येथील विवेकानंद ज्युनिअर कॉलेजच्या वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित विद्यार्थी करिअर मार्गदर्शन व्याख्यानात प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे होते.

यावेळी टिक्के पुढे म्हणाल्या, कंपनीला प्रोत्साहन देणे, सेक्रेटरी रेकॉर्ड ठेवणे, नियमांचे पालन करणे आणि कंपनीचा सर्वांगीण विकास करणे, हे कंपनी सेक्रेटरीचे उत्तम वैशिष्ट्य आहे.

शुभांगी पाटील आणि अश्विनी गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. वर्षा महाडिक यांनी आभार मानले. ग्रंथालय हॉल येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक, विद्यार्थी, पालक यांची उपस्थिती होती.

### उज्ज्वल यशाची परंपरा कायम

प्रा. शिल्पा भोसले म्हणाल्या, कंपनी सेक्रेटरी हे एक रोजगाराचे उत्तम क्षेत्र आहे. विवेकानंद ज्युनियर कॉलेज शाखेतील गुणवंत व यशवंत विद्यार्थ्यांनी वाणिज्य शाखेतून सी. ए. आणि सी. एस. परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करण्याची परंपरा कायम ठेवली आहे. संस्था प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

29/7/26